आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१५ सप्टेंबर २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते राज्यभरातल्या ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधल्या संविधान मंदिराचं लोकार्पण / राज्यघटना हा लोकशाहीचा आत्मा, तर संसद म्हणजे राज्यघटनेचा रक्षणकर्ता असल्याचं उपराष्ट्रपतींचं प्रतिपादन
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दाखवला ६ वंदे भारत रेल्वे गाड्यांना हिरवा झेंडा, सबका साथ सबका विश्वास या मंत्रानं देशात विचारधारा आणि प्राधान्यक्रमात आमूलाग्र बदल केल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- देशातील प्रसारणाचा महत्त्वपूर्ण भाग असलेल्या दूरदर्शनची ६५ वी गौरवरशाली वर्षपूर्ती
- वन्यजीव रक्षक नीलेश बापट यांचं निधन

  **आणि**
- बेल्जियमध्ये ब्रुसेल इथं झालेल्या डायमंड लीग स्पर्धेत नीरज चौप्राला रौप्य पदक

**<><><><><>**

राज्यघटना हा लोकशाहीचा आत्मा, तर संसद म्हणजे राज्यघटनेचा रक्षणकर्ता आहे, राज्यघटना ही मिरवण्यासाठी नसून वाचून, समजून घेण्यासाठी आणि आदर करण्यासाठी आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. राज्यभरातल्या ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये संविधान मंदिराचं लोकार्पण मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयातल्या कार्यक्रमात दूरदृश्य पद्धतीनं केल्यानंतर ते आज बोलत होते. आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनी या संविधान

मंदिराचं उद्घाटन करण्याचा हा क्षण अविस्मरणीय आहे, या मंदिरामुळे राज्यघटनेबद्दल जागृती वाढेल, राज्यघटना हे सुद्धा आपलं खरं मंदिर आहे, अशी ग्वाही धनखड यांनी दिली. राज्यघटनेबद्दल जाणून घेणं ही एक निरंतर प्रक्रिया आहे, असं ते म्हणाले. राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात शिक्षण घेतलं आणि त्या शिक्षणाच्या जोरावर इतकं मोठं योगदान दिलं, त्या ठिकाणी हा कार्यक्रम होणं हे सौभाग्य असल्याचं ते म्हणाले. युवा पीढीनं सर्वत्र राष्ट्राचा गौरव वाढवावा असं आवाहन त्यांनी केलं.

**होल्ड--बाईट--उपराष्ट्रपती**

राज्यघटनेनं दिलेल्या आरक्षणाला काही लोक विरोध करत आहेत, मात्र आरक्षण हा भारताचा, राज्यघटनेचा आत्मा आहे. आजच्या युवांनी राज्यघटनेचा अनादर करणाऱ्यांविरुद्ध लढण्याची तयारी ठेवावी, सर्वांनी स्वहिताच्या आधी देशहिताचा विचार करावा, असं आवाहन त्यांनी केलं. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्याचे कौशल्यविकास, रोजगार, स्वयंउद्योजकता आणि नवनिर्मिती मंत्री मंगलप्रभात लोढा आणि इतर यावेळी उपस्थित होते. भारत ही जगातली सर्वात जास्त विविधतेनं नटलेली लोकशाही आहे आणि हीच विविधता आपल्या लोकशाहीला बळ देते, असं मत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केलं.

यावेळी 'एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि त्यांच्या पत्नी सुदेश धनखड यांनी वृक्षारोपण केलं.

**<><><><><>**

सबका साथ सबका विश्वास या मंत्रानं देशात विचारधारा आणि प्राधान्यक्रमात आमूलाग्र बदल केला असून गरीब, आदिवासी, दलित, वंचित, मागासवर्गीय, महिला, युवावर्ग आणि शेतकऱ्यांना प्राधान्य दिलं जात आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आपल्या झारखंड दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात आज ६ वंदे भारत रेल्वे गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांनी ६६० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध रेल्वे प्रकल्पांची पायाभरणी आणि राष्ट्रार्पणही केलं.

केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजनांअंतर्गत बांधण्यात आलेल्या देशभरातल्या दोन कोटी नवीन घरांच्या वाटपाचा शुभारंभ आणि ४६ हजार लाभार्थ्यांच्या गृहप्रवेश सोहळा देखील या कार्यक्रमात पार पडला. या योजनेच्या लाभार्थ्यांच्या बँक खात्यात एकूण ३२ हजार कोटी रुपयांचा थेट मदतीचा पहिला हप्ता जमा करण्यात आला. प्रधान मंत्री आवास योजना- ग्रामीणच्या २० हजार लाभार्थ्यांना प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आवास मंजुरी पत्रांचं वाटपही करण्यात आलं.

**<><><><><>**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी येत्या दोन दिवसांमध्ये मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार असल्याची घोषणा आज केली. दारू घोटाळा प्रकरणी केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयानं दोन दिवसापूर्वी जामीन मंजूर केला होता. त्यानंतर तिहार कारागृहातुन बाहेर आलेल्या केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या दोन दिवसांत आम आदमी पार्टीच्या सर्व आमदारांची बैठक घेऊन त्यात नव्या मुख्यमंत्र्याचं नाव निश्चित केलं जाईल, असं केजरीवाल म्हणाले आहेत. पुढच्या वर्षी फेब्रुवारी

महिन्यात होणाऱ्या दिल्लीच्या विधानसभा निवडणुका यंदा नोव्हेंबर महिन्यात घ्याव्यात अशी मागणी केजरीवाल यांनी केली आहे. अरविंद केजरीवाल यांची राजीनाम्याची घोषणा हा फक्त प्रसिद्धीसाठी असल्याची टीका भाजपाचे प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी केली आहे.

<><><><><>

केंद्रातलं सरकार आणि राज्यातलं महायुतीचं सरकार हे शेतकरी विरोधी सरकार आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं आज धुळे जिल्ह्याल्या शिंदखेडा इथं आयोजित केलेल्या शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. सरकारला शेतकऱ्यांबद्दल आस्था नाही त्याचप्रमाणं राज्यात महिला सुरक्षित नाहीत, त्यामुळे विधानसभा निवडणुकीत हे सरकार हटवून आपल्या विचारांचं सरकार आणणं ही जनतेची जबाबदारी आहे, असंही ते म्हणाले.

<><><><><>

महाराष्ट्रात गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहचला आहे. येत्या १७ तारखेला अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणरायाचं विसर्जन करून निरोप दिला जाईल. पण त्यापूर्वी गणेशोत्सवानिमित्त राज्यभरात अनेक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शासकीय निवासस्थानी वर्षा इथं गणेशाचे दर्शन घेऊन त्याची पूजा केली.

जळगाव शहरात अनंत चतुर्दशीला विसर्जनासाठी होणारी गर्दी कमी करण्यासाठी लॉटरी पद्धतीने क्रमांक काढून त्यानुसार मंडळांना वेळ देण्यात येणार आहे. यामुळे रात्री एकाच वेळी होणारी गर्दी टाळून मंडळही दिलेल्या वेळेत येऊ शकतील.

<><><><>

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यामध्ये आज आपण जाणून घेणार आहोत, ओमानमधल्या गणेशोत्सवाविषयी.

<><><><>

देशातील प्रसारणाचा महत्त्वपूर्ण भाग असलेलं दूरदर्शन आज आपली ६५ गौरवशाली वर्षे पूर्ण करत आहे. १५  सप्टेंबर १९५९ रोजी स्थापन झालेल्या दूरदर्शनने भारताच्या प्रसारण युगाची सुरुवात केली. तत्कालीन राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी त्या दिवशी दूरदर्शनच्या पहिल्या प्रसारणाचं उद्घाटन केलं होतं. १९७५  पर्यंत दूरदर्शन आकाशवाणीचाच घटक होता. १ एप्रिल १९७६  रोजी, त्याचं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या एका स्वतंत्र विभागात रूपांतर झालं आणि  ते प्रसार भारती अंतर्गत आलं. सरकारचं स्वायत्त सार्वजनिक सेवा प्रसारक असलेलं दूरदर्शन प्रसार भारतीच्या दोन विभागांपैकी एक आहे. आज, दूरदर्शन आपल्या स्टुडिओ आणि ट्रान्समीटरच्या विशाल जाळ्यासह देशातली सर्वात मोठी प्रसारण संस्था आहे.

<><><><>

रत्नागिरी जिल्ह्यातल्या चिपळूणमधले प्रसिद्ध वन्यजीव रक्षक नीलेश बापट यांचं काल हृदयविकाराच्या झटक्यामुळे निधन झालं. ते ४६ वर्षांचे होते. त्यांनी चिपळूण इथे डोंगरावर जैवविविधतेने समृद्ध असलेला वनीकरण प्रकल्प साकारला होता. वाट चुकलेल्या वन्यप्राण्यांना त्यांच्या अधिवासात सोडण्यासाठी ते प्रयत्नशील होते. त्यांच्या कार्याची दखल घेऊन वनविभागाने त्यांची मानद वन्यजीव रक्षक म्हणून नियुक्ती केली होती.

**<><><><><>**

भारताच्या नीरज चोप्रानं बेल्जियमध्ये ब्रुसेल इथं झालेल्या डायमंड लीगचं सलग दुसऱ्यांदा रौप्य पदक पटकावलं आहे. नीरजनं ८७ पूर्णांक ८६ मीटर अंतरावर भाला फेकला, त्याचं सुवर्णपदक केवळ एका सेंटीमीटरनं हुकलं. या स्पर्धेत अँडरसन पीटर्स सुवर्ण तर जर्मनीच्या ज्युलियन वेबर यानं कांस्य पदक पटकावलं.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्यातल्या शिंदखेडा तालुक्यात प्रवासी वाहन आणि व्हॅन यांच्यात झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला तर चार जण जखमी झाले. मृतांमध्ये तीन महिलांचा समावेश आहे. सर्व प्रवासी शिंदखेडा तालुक्याचे रहिवासी आहेत. जखमींना धुळे इथल्या भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात रानटी हत्तींच्या कळपाने पिकांची नासधूस केल्याने भातशेतीचं नुकसान झालं आहे. या कळपात २८ रानटी हत्ती असून ते कुरखेडा, आरमोरी, शंकरनगर, पाथरगोटा या भागात त्यांनी नुकसान केलं आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पंचनामे करून भरपाई देण्यात येईल, असं वनविभागाने म्हटलं आहे. हे हत्ती सध्या वैरागड परिसरात चुनबोडीच्या जंगलात गेले असून ते पुढे पोर्ला परिसरात जाऊ शकतात, असा अंदाज वनविभागाने वर्तवला आहे.

**<><><><><>**